# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२० http://www.dteau.org

roaurangabad.dte@gmail.com


**तात्काळ**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१४/3320

दिनांक :- 13 JUN 2014.

प्रति,

प्राचार्य,

शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित अभ्यासक्रमांच्या

तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिमार्णशास्त्र/एम.बी.ए/एम.सी.ए

पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी/

अभ्यासक्रमांच्या सर्व संस्था,

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत.**
**जनहित याचिका क्र.१०३/२०११ हिंदू जनजागृती समिती विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१६ आस्था/संकीर्ण/२०१४/१२१ दिनांक

विषयांकीत नमुद याचिकेअन्वये राष्ट्रध्वजाचा अवमान होत असल्याची दखल मा.उच्च न्यायालयाने घेतली आहे.

मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार सर्वसाधारणतः प्रजासत्ताक दिन,स्वातंत्र्य दिन व इतर राष्ट्रीय कार्यक्रम प्रसंगी वैयक्तीकरित्या कागदी तसेच प्लास्टिक निर्मित राष्ट्रध्वजाचा वापर केला जातो. अशा कार्यक्रमानंतर राष्ट्रध्वज इतरत्र पडलेले दिसून येतात **केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकच्या वापरास मान्यता नाही.** या शिवाय खराब झालेले राष्ट्रध्वज ध्वज संहितेमधील तरतुदीनुसार नष्ट करणे आवश्यक आहे.

सबब राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये यासाठी तसेच राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही व राष्ट्रध्वजा संदर्भातील सर्व अधिनियमांच्या तरतुदी/सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल यादृष्टीने आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये परिणामकारक माध्यमान्वये जागरुकता निर्माण करावी व अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.

प्रत :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सादर.